गुरुवार, दि. ३ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३२७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करा

## अन्यथा रास्ता रोको आंदोलन; नागरिकांचा ईशारा



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील फुलबाजार ते मोती मस्जिद मामा चौक कडे जाणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून हा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात यावा अशी मागणी मोती मस्जिद व फुलबाजार परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त व पोलीस अधिक्षकांकडे केली आहे. तात्काळ रस्ता मोकळा न केल्यास येत्या पंधरा दिवसांनंतर रास्ता रोको आंदोलनचा ईशाराही देण्यात आला आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फुल बाजार ते मोती मस्जिद मामा चौक कडे जाणाऱ्या मार्गावर नेहेमी वाहतुकीचा खोळंबा होतो. या मार्गावरील दुतर्फा असलेल्या दुकानदारांनी त्यांच्या दुकानांसमोर फेरीवाले, गाडीवाले व ईतरांना जागा देऊन रस्त्याची रुंदी कमी केलेली आहे. त्यातच खरेदीसाठी येणाऱ्यांची वाहने ही रस्त्यातच लावली जात आहे. एकप्रकारे अतिक्रमण करुन व्यवसाय करण्यात येत आहे. याबाबीकडे जालना शहर महानगर पालिकेचे स्वच्छता निरीक्षक व वाहतुक शाखेचे अधिकारी-कर्मचारी हे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत. यापुर्वी देखील या संदर्भात विविध तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. मात्र, त्याचा कोणतीही दखल अद्याप पर्यंत घेण्यात आलेली नाही. तात्पुरती दिखाव्यासाठी कारवाई केली जाते आणि पुन्हा परिस्थिती जैसै थे होते. या मार्गावरून मार्गक्रमण करतांना या भागातील नागरिकांसह इतर वाहनधारकांना त्रास होतो आहे. तसेच वाहतुकीच्या खोळंब्यामुळे हॉर्न आणि गाड्यांचे आवाज परिसरातील नागरिकांना बधिर करण्यागत होत आहे.

मोती मस्जिद येथे मुस्लीम समुदाय सामुहिक नमाज पठणासाठी नियमित येतात. यांना देखील या बाबींचा त्रास होतो आहे. तेथे पार्किंगची व्यवस्था नाही. मस्जिद समोर असलेल्या स्व. स्वातंत्र्यसेनानी अब्दुल रहेमान कुरैशी चौक आहे. या ठिकाणीही अतिक्रमण करण्यात आलेले आहे.

फुल बाजार ते मोती मस्जिद मामा चौक कडे जाणाऱ्या मार्गावरील व स्व. स्वातंत्र्यसेनानी अब्दुल रहेमान कुरैशी चौक परिसरातील अतिक्रमण तातडीने हटविण्यात यावे. व नेहेमीकरता रस्ता मोकळा करण्यात यावा. व जालना शहर महानगर पालिका स्वच्छता निरीक्षक व वाहतुक शाखेचे अधिकारी-कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. याशिवाय या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही यासाठी कठोरात कठोर पाऊले उचलण्यात यावे. यासाठी मनपा आयुक्त व शहर वाहतुक शाखेस योग्य त्या सुचना देण्यात याव्यात व भविष्यात या मार्गावर पुन्हा अतिक्रमण करुन रस्त्याची रुंदी छोटी करण्याचा प्रयत्न केल्यास मनपा प्रशासन व वाहतुक शाखेस दोषी धरुन जबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनाचा गांभीर्याने विचार करुन तातडीने कारवाई करावी अन्यथा पंधरा दिवसांनंतर रास्ता रोको आंदोलन करण्याचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

निवेदनावर फुलबाजार व मोती मस्जिद परिसरातील सर्व नागरिक तसेच व्यवसायिक मोती मेडीकल, अजंठा रेस्टारंट, सारा रेडीमेड, आरजी मोबाईल, महाराज शूज, पटेल शूज, लाट सहाब, नवाब शूज, आँचल, चौधरी कलेक्शन, महाराजा चष्मा घर, डिलक्स ब्रेड, अक्सा मेडीकल, भारत वॉचेस, श्रीमान श्रीमती, हिंद वॉचेस, गुरू रेडीमेड, समिर कॉम्पलेक्स, मो अब्दुल सत्तार डिंगोरा, सय्यद नजीर सय्यद युनुस, सय्यद फेरोज जागीरदार, सय्यद अशपाक सय्यद इशाक, नूर मोहम्मद खान, शेख मोजीब शेख दादामियाँ, शेख हबी शेख दादामियाँ, शेख अमिर अहेमद, अब्दुल अलिम साहा, अमीत रजा साहा, निसार ईसाक बागवान, इब्राहीम अहेमद शाह, मुनव्वर अली, ताहीर अली, एकबाल, समीर खान, फरहान खान, मो असलम मो उस्मानियाँ, परवेज आलम, फुसान कुरैशी, शेख नबी, शाहरूख सय्यद अलिम, आकाश देवावाले, हनीफ कुरैशी, सद्दाम शेख, फेरोज सय्यद, असलम खान, शाहेद खान, सय्यद रहेमान, अफरोज खान, रमेश तनपुरे, कृष्णा मिटकर, राहुल राऊत, संजय राऊत, बबलु खान, अकबर खान आदी शेकडो साक्षऱ्या आहेत.

---

युवा आदर्श

### अधिक घाई ...

जवळ यावे दुरावले
इतरांना अधिक घाई
ब्रेकिंग न्यूज द्यावया
सजली मिडियाबाई
लाऊन टाकावे लग्न
रे नंतर करावी सगाई
मुहूर्त लवकर साधेलं
सकाळी वाजे शहनाई
जुनाट फोटो दाखवत
कितीदा करी शिलाई
सांगतात तिसरे चौथे
कशात आहे रे भलाई
एकत्र येणार परिवार
शिळी ती होय मिठाई
आणा एखादा श्रीहरी
जो करे भली शिष्टाई
समतोल हवा स्वभावे
साध्य करायं उदिष्टाई
विसरावे जुने हेवे दावे
हवी जराशी धारिष्टाई
विचारपूर्वक समजावे
जाण कशात अभिष्टाई
सोपी नसे गुंतागुंत ही
नात्यात असे क्लिष्टाई
अशक्य जरी विसरणे
आधी केलेली लढाई
एकसंघ होता परिवार
पुनश्च येणार चविष्टाई

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

## शेतकऱ्यांची एक हजार वेळा माफी मागेल, राजकारण करणाऱ्यांची नाही- आ. लोणीकर

**मुंबई -** गेल्या आठवड्याभरापासून माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या वक्तव्यांवरून विरोधकांनी राळ उठविली होती. विधानसभेतही विरोधकांनी गेल्या दोन दिवसांपासून सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. यावर विधानसभेत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर त्यांचे म्हणणे मांडले.



आ. लोणीकर म्हणाले की, मी तसे काहीही बोललो नाही, तरी देखील माझ्या वक्तव्यामुळे जर शेतकऱ्यांची मने दुखावली गेली असतील तर एक वेळा नाही तर एक हजार वेळा माफी मागेल. मला शेतकऱ्यांची माफी मागायला लाज वाटत नाही. मात्र, या राजकारण करणाऱ्यांची माफी मागणार नाही, पिंपळाचं पान पडलं ते हे म्हणताहेत पिंपळगाव जळालं, मी शेतकरी कुटुंबातला आहे. मला शेतकऱ्यांनी पंचवीस वर्षे निवडून दिले आहे. असे म्हणत विरोधकांच्या टिकेला सडेतोड उत्तर दिले.

शंभुराजे देसाई यांनी देखील माजी मंत्री आ. लोणीकर यांचे समर्थन करतांना आ. लोणीकरांचा उद्देश - हेतू वाईट नव्हता, तोडून मोडून दाखविलेल्या वक्तव्याचा विरोधकांनी राजकीय भांडवल करू नये, त्यांनी शेतकऱ्यांची माफी मागितलेली असल्याचे म्हटले आहे.

---

## महाविद्यालयात शिकवणी न घेता कागदोपत्री विद्यार्थ्यांच्या नावाखाली योजनेचा पैसे हडपणाऱ्या संस्था चालकावर गुन्हे दाखल करा

### जय भिम क्रांती सेनेची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील कागदावर सुरु असलेल्या महाविद्यालयांच्या संस्था चालकांनी आणि प्राचार्यांनी शिक्षणाचा बाजार मांडलाय बनावट विद्यार्थी दाखवून शासनाची शिष्यवृत्ती आणि स्वाधार योजनेचा लाभ मिळवून पैसे हडपणार्या संस्थाचालक आणि प्राचार्याची तात्काळ चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी जय भिम क्रांती सेनेचे अध्यक्ष दिपक बोर्डे यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना जिल्ह्यात अनेक महाविद्यालये ही कागदावरच असून त्यांच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या नावाखाली मोठा भ्रष्टाचार करण्यात येत आहे. सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या नावे शिष्यवृत्ती आणि स्वाधार योजनेतून लाखो रुपये उचलून महाविद्यालयाकडून भ्रष्टाचार सुरु आहे. केवळ कागदावरच महाविद्यालय चालवून विद्यार्थ्यांची तासिका न घेता, विद्यार्थी नियमित महाविद्यालयात येत असल्याची खोटी माहिती महाविद्यालयाकडून शासनाला सादर करण्यात येत आहे. हा प्रकार अत्यंत चुकीचा आणि बोगस असून शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारणारी आहे.

त्यामुळे शासनाची मोठी फसवणूक होत आहेत. हा प्रकार थांबविण्यासाठी तात्काळ महाविद्यालयात बायोमेट्रीक मशिन सह सीसीटीव्ही बसविण्यात यावेत व बायोमेट्रीक हजेरी घेऊनच विद्यार्थ्यांना उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात यावे. परंतु, तसे न करणार्या महाविद्यालय आणि सामाजिक न्याय विभागाच्या संबंधीत अधिकारी आणि कर्मचारी यांना दोषी धरुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. असेही निवेदनात म्हटले आहे.

२०२४ ते २०२५ या कालावधीत सामाजिक न्याय विभागात ज्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्याची चौकशी करण्यासाठी व महाविद्यालयाच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी एक उच्च स्तरील चौकशी समिती नियुक्त करावी. तक्रार झालेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या, विद्यार्थ्यांची नावे, त्यांच्या उपस्थितीची सत्यता पान ३ वर

---

## ‘रोटरी मिडटाऊन कट्टा’ ठरणार शहराच्या हृदयात विरंगुळ्याचा नवा श्वास - डॉ. पांचाळ

### रस्त्यालगतच्या ओसाड जागेला लाभले नवजीवन

**जालना । प्रतिनिधी -** नवनवीन संकल्पना प्रत्यक्षात उतरविणाऱ्या रोटरी क्लब जालना मिडटाऊनचा बैठक व्यवस्था, विद्युत रोषणाई, वॉकिंग ट्रॅक, सेल्फी पॉईंटचा अविष्कार असलेला ’रोटरी मिडटाऊन कट्टा’ हा जालन्यातील विरंगुळ्याचा अनमोल ठेवा ठरेल, असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी येथे बोलताना काढले.

जालना शहरातील दुर्गा माता मंदिर ते पोलीस प्रशिक्षण केंद्रासमोरील परिसरात रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनच्या पुढाकाराने आणि पोलीस प्रशिक्षण विद्यालय, महापालिका, समस्त महाजन ट्रस्ट यांच्या सहकार्याने सुशोभीकरण करण्यात येऊन रोटरी मिडटाऊन कट्टा तयार करण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्याहस्ते आणि पोलीस अधीक्षक अजय बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, रोटरीचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, पोलीस प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य अशोक बनकर, समस्त महाजन ट्रस्टचे उदय शिंदे, क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी, सचिव गौरव मोदी, प्रकल्प प्रमुख प्रतीक नानावटी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दि. ३० जून रोजी सायंकाळी करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. रस्त्यालगतचा सर्व परिसर सपाटीकरण करून तेथे २० सिमेंट बेंचेस, पथदिवे, विद्युत रोषणाई, संरक्षक जाळी बसविण्यात येऊन, झाडांना रंग देण्यात देण्यात येऊन, फुटपाथ तयार करण्यात आला आहे. त्यामुळे हा परिसर अतिशय नयनरम्य बनला आहे. या ठिकाणी लवकरच ऐतिहासिक पाण्याचा जलकुंभ कार्यान्वित करण्यात येऊन, रोटरी मिडटाऊन कट्ट्याच्या सुशोभीकरणात भर टाकली जाणार आहे.




यावेळी पोलीस अधीक्षक अजय बंसल म्हणाले की, रोटरी परिवाराचे सामाजिक उपक्रम आणि पोलीस प्रशासनाच्या उपक्रमात सदैव योगदान लाभते. आता या उपक्रमाच्या माध्यमातून शहर सुशोभीकरणात त्यांचा मोलाचा सहभाग लाभला आहे. अशोक बनकर यांनी सकारात्मक कार्यासाठी कोणीतरी पुढाकार घेण्याची गरज असते. रोटरी मिडटाउनच्या पुढाकारातून हा परिसर अत्यंत नयनरम्य बनला आहे. या उपक्रमाचा उद्देश विशद करताना प्रकल्प प्रमुख प्रतीक नानावटी यांनी सर्वांच्या पान ३ वर

---

## शासन निर्णय झुगारून मंठ्यातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांकडून अवैध शुल्क वसुली

### संभाजी ब्रिगेडकडून महाविद्यालय प्रशासनास निवेदन



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालय प्रशासनाने शासन आदेशांचा भंग करत अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग, आर्थिक दुर्बल घटक व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर शुल्क वसूल केल्याचा आरोप संभाजी ब्रिगेड, मंठा तालुक्याच्या वतीने करण्यात आला आहे. याबाबत तालुकाध्यक्ष शिवश्री बालासाहेब खवणे यांनी महाविद्यालय प्रशासनाला लेखी निवेदन सादर केले असून, तात्काळ शुल्क परतफेड न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

ब्रिगेडच्या म्हणण्यानुसार, दि. १९ जुलै २०२४ चा शासन निर्णय (शिप्रु-२०२४/प्र.क्र.२०६/उ.प्र.४) आणि समाज कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र (दि. २३ जून २०२५) हे स्पष्टपणे सांगतात की मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून कोणतेही प्रवेश व शिक्षण शुल्क घेऊ नये. तरीही महाविद्यालयाकडून सर्वप्रकारची फी वसूल केली जात आहे.

त्याचबरोबर प्रवेश फॉर्मसाठी रोख रक्कम घेणे,डुप्लिकेट पावत्या, पावत्यांवर णउख्रडए क्रमांक नसणे, आणि शासनमान्य डिजिटल प्रणालीकडे दुर्लक्ष करून रोख व्यवहार करणे हे प्रकारही नियमबाह्य असल्याचे सांगण्यात आले.

यामुळे शासनाच्या पारदर्शकतेच्या धोरणाला धक्का बसत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

संभाजी ब्रिगेडने पुढील ठाम मागण्या मांडल्या आहेत:

सर्व बेकायदेशीर फीची तात्काळ पान ३ वर

## संपादकीय पान

# ‘नन्हे फरिश्ते’ मुळे फुलले हास्य

घरात भांडण होणे, गर्दीत हरवणे, पुण्या - मुंबईसारख्या मोठ्या शहराचे आकर्षण या आणि अशा अनेक कारणांमुळे राज्यातील अनेक मुले पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात दाखल होतात. कुटुंबाशी ताटातूट झालेली ही मुलं पुण्या - मुंबईतील रस्त्यांवर, फुटपाथवर, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॉपवर भटकत असतात. भीक मागून पोटाची खळगी भागवत असतात. यातील काही मुले वाम मार्गाला लागतात तर काही मुले असेच अनाथ म्हणून भटकत असतात. तर काही मुलांना गुंड मवाली जबरदस्तीने भीक मागायला लावतात. त्या मुलांचा गुंड मवाली अतोनात छळ करत असतात. या मुलांना पुन्हा स्वगृही पाठवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने ( आर पी एफ ) नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली. या मोहिमे अंतर्गत एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या कालावधीत मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील वेगवेगळ्या स्थानकांत रेल्वे संरक्षण दलाच्या विशेष पथकाने ( आरपीएफ) २३५ मुलांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही सर्व मुले १२ ते १५ वयोगटातील आहेत. एकट्या पुणे स्थानकात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात ५१ मुलांचा शोध घेऊन रेल्वे सुरक्षा दलाच्या विशेष पथकाने ( आरपीएफ ) या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. विशेष म्हणजे शोधलेल्या या मुलांमध्ये पोलीस ठाण्यात नोंद नसलेलीही काही मुले आहेत. ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम रेल्वे सुरक्षा दलाकडून मागील सात वर्षांपासून राबवण्यात येत आहे. २०१८ मध्ये ऑपरेशन नन्हे फरिश्ते या मोहिमेची सुरुवात झाली. आपल्या आई वडिलांपासून ताटातूट झालेली, घरातून निघून पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात पळून आलेली, हरवलेल्या अल्पवयीन मुला मुलींना पुन्हा आपले आई वडील मिळावेत, त्यांना त्यांचे घर पुन्हा मिळावे यासाठी ही मोहीम राबवली जाते. मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दल, रेल्वे पोलीस, रेल्वे कर्मचारी यांच्या समन्वयातून ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली जाते. या मोहिमे अंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाने रेल्वे डब्यात, रेल्वे स्थानकात किंवा रेल्वेच्या हद्दीत हरवलेल्या किंवा पुण्या - मुंबईत पळून आलेल्या हजारो मुलांची सुटका केली. या मोहिमेमुळे हजारो अल्पवयीन मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून आई वडिलांकडून, कुटुंबापासून दुरावलेली हजारो मुले आपल्या आई वडिलांच्या कुशीत सामावली आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने विशेष आराखडा तयार केला. रेल्वेच्या हद्दीत ज्या ठिकाणी अल्पवयीन मुले मुली भीक मागत आहेत अशी ठिकाणे पोलिसांनी शोधून काढली. या ठिकाणी पोलिसांनी अतिशय गुप्तपणे कारवाई केली. या मुलांना भीक मागायला लावणाऱ्या रॅकेटचा शोध घेतला आणि त्यांना अटक करून हजारो मुलांची सुटका केली. मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेऊन या मुलांचे प्रबोधन करण्यात आले. या मुलांच्या पालकांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे मोठे आव्हान रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलिसांसमोर होते. ते आव्हान पोलिसांनी लीलिया पेलले आहे. ही मोहीम अतिशय स्तुत्य आणि अनुकरणीय अशी आहे. ही मोहीम राबवणाऱ्या रेल्वे सुरक्षा दलाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. रेल्वे सुरक्षा दलाने ही मोहीम राबवून हजारो मुलामुलींना अनाथ होण्यापासून आणि वाम मार्गाला लागण्यापासून वाचवले आहे. ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मनापासून धन्यवाद द्यावे लागेल. मुंबई पोलीस दलातर्फे देखील 'ऑपरेशन मुस्कान' नावाची अशीच एक मोहीम राबविण्यात येते. या मोहीमे अंतर्गत देखील हजारो मुलामुलींना त्यांच्या पालकांकडे, कुटुंबाकडे सुपूर्त करण्यात आले आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन मुस्कान या सारख्या मोहिमा फक्त पुण्या - मुंबई पुरत्याच मर्यादित न राहता सर्व महानगरात राबवायला हव्यात म्हणजे बेघर झालेली लाखो मुले स्वगृही परततील आणि स्वगृही परतणाऱ्या या मुलांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

चलो आझाद मैदान

# उठ कक्कया जागा हो, महामंडळाचा धागा हो!

वीरशैव कक्कया ढोर समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्याच्या हक्काचे आर्थिक विकास महामंडळ मिळवून देण्यासाठी तळागातील ढोर (कक्कया )बांधवाना आता एकजूट दाखवण्याची वेळ आली आहे. आपला समाज आजवर अनेक पक्षाचा दावणीला बांधला गेला.त्यांनी आपला स्वार्थ साधून घेतला.पण समाज मात्र मागे राहिला.या समाजाला योग्य दिशा देण्यासाठी,येणाऱ्या भावी पिढीचे भविष्य घडविण्यासाठी,आपापसातील मतभेद बाजूला सारून पावसाळी अधिवेशनात सरकारला घेराव घालण्यासाठी सज्ज होण्याची वेळ आली आहे.

गेल्या वर्षी २८जूनला संत कक्कया स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाच्या मागणीसाठी आझाद मैदानात हजारो बांधवाच्या साक्षीने राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले होते.

याची दखल घेऊन मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संत कक्कय्या समाजाला महामंडळ दिले जाण्याची घोषणा केली. परंतु ती घोषणा हवेतच विरली.संत कक्कय्या समाजाच्या मागणी नंतर सरकारने इत्तर समाजाला निवडणुका डोळ्या समोर ठेऊन महामंडळ देऊ केले. परंतु संत कक्कय्या समाजाने पाठपुरावा करुन सुद्धा महामंडळ दिले नाही. यासाठीचं पुन्हा एकदा संत कक्कय्या समाजाने आझाद मैदान येथे ७जुलै २०२५ रोजी एकदिवशीय धरणे आंदोलन करण्याची घोषणा केली असून त्या निमित्ताने वीरशैव कक्कया कल्याण मंडळाचे सर्व पदाधिकारी पायाला भिंगरी लावून मुबंई सह संपूर्ण महाराष्ट्र पिंजून ढोर समाजाला या आंदोलनात सहभागी होण्याचे अवाहन करीत आहेत आणि त्याला प्रतिसाद मोठया प्रमाणात मिळत आहे.

ढोर (कक्कया) समाजांच्या न्याय हक्कासाठी आजपर्यंत कुठल्याही सरकारकडून ढोर (कक्कया) समाजाला पुरेपूर न्याय मिळाला नाही आणि ढोर समाजाने सुद्धा कुठलेही आंदोलन करून आपल्या न्याय हक्कासाठी मागणी केली नाही. पण आजची परिस्थिती आणि उद्याची चिंता व्यक्त करता (ढोर कक्कया )समाजाला अधिक अडचणीचा सामना करावा लागणार आहे. कारण उद्योग व्यवसायातून आणि शिक्षणातून आर्थिक बळ नसल्यामुळे हा समाज उद्योग व्यवसायातून वंचित होत चालला आहे .

सरकारकडून दिवसेंदिवस जातीचे आरक्षण धोक्यात येत आहे .आपल्या समाज बांधवांना रिझर्वेशन चा धोका होणार आहे, त्यामुळे शैक्षणिकदृष्ट्या आणि व्यावसायिक दृष्ट्या समाज मोठ्या संख्येने मागे पडताना दिसणार आहे. गेल्या पन्नास वर्षापासून असणारे लिड कॉम महामंडळ हे संत रोहिदास महामंडळ झाले आहे. पण त्याच्यावर कोणत्याही नेतेमंडळींनी ब्र शब्द केला नाही. या पन्नास वर्षात या महामंडळातून किती वाटा ढोर( कक्कया) समाजाला मिळाला याचे निदान केल्यावर असे कळाले की फक्त दोन टक्के सुद्धा नाही. याचा अर्थ काय?

आम्ही अतिशय श्रीमंत आहोत... की ,आम्ही अतिशय शूद्र आहोत. आम्हाला शासकीय आमच्या हक्काचे अनुदान मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. या सर्व गोष्टींना वाचा फोडण्यासाठी,आज आम्हाला आमचे स्वतंत्र संत कक्कया आर्थिक विकास महामंडळ झाले पाहिजे आणि ते आपण मिळवल्या शिवाय शांत बसायचे नाही.

समाजात एकमेकांना पाण्यात पाहणाऱ्यांनी आपल्या पुढील पिढीचा विचार करता एकत्र येऊन हे आंदोलन यशस्वी करायचे आहे.आज जर तुम्ही मागे राहिलात तर भविष्यात ही पिढी तुम्हाला माफ करणार नाही. आंदोलनात कुणी लहान मोठा नाही तर हे आंदोलन आपल्या पुढच्या पिढीचे जीवन सुककर करण्यासाठी आहे. हे लग्नाचे आमंत्रण नाही की मला मिळाले नाही म्हूणन येणार नाही तर आपल्या समाजातील मुलांचे भविष्य उज्वल करण्यासाठी आहे याचे भान असू दया.

एक दिवस समाजासाठी, समाजातील तरुण पिढीच्या भविष्यासाठी ७ जुलैला सकाळी १० वाजता महाराष्ट्रातील तमाम ढोर (कक्कया )बांधवानी



एकत्र येऊन आझाद मैदानात धरणे आंदोलन करुन संत कक्कया समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यास सरकारला भाग पाडू.

उठ कक्कया जागा हो, महामंडळाचा धागा हो!

आता नाही तर कधीच नाही!

**दत्ता श्रावण खंदारे धारावी**
**९६९९३१३६२१**

# सातत्याने शेतकऱ्यांचा अपमानच होतोय!

आज शेतकऱ्यांची परिस्थिती बघितली तर जवळपास साठ ते सत्तर टक्के शेतकरी हा अल्प अत्यल्प भूधारक आणि कोरडवाहू शेती करणारा आहे. चांगला पाऊस झाला पिक चांगली आलीत, तरीपण उत्पादनखर्च वजा जाता घर खर्च भागवण्या करिता त्याला कर्जाशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे शेतकरी सतत आणि सतत कष्ट करीत असतो. आणि त्याशिवाय त्याला काही पर्याय नसतो. कुठल्याही प्रकारची चैन नाही, आनंद नाही , समाजात प्रतिष्ठा नाही. ना त्याच्या शेतीला प्रतिष्ठा ना त्याला प्रतिष्ठा. त्यामुळेच आता बहुतांशी नवीन पिढी शेती करण्यापासून परावृत्त होत आहेत. असा हा आपला बळीराजा सतत कुठल्या ना कुठल्या विवंचनेत असतो. चेहऱ्यावर आनंद नाही,. का कुठली अपेक्षा नाही. परिस्थितीने अतिशय शांत होऊन गेलेला आणि चेहऱ्यावर कष्टाच्या खुणा जाणवतात. शेतकरी हा सुद्धा समाजाचा भाग आहे त्याला पण काही करावेसे वाटते पण परिस्थिती ने गांजल्या मुळे तो काही करू शकत नाही. फक्त आपल्यासमोर जी परिस्थिती आहे ती उघड्या डोळ्याने तो पाहत असतो आणि आतल्या आत धुमसत असतो. कुटुंबात मुल, मुली असतात.त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न असतो. काही शिक्षित असतात काही उच्च शिक्षण घेतले असतात. त्यांना काही वेगळे करावेसे वाटते. नोकरीच्या शोधात असतात. पण नोकरी मिळत नाही म्हणून तेही हतबल असतात. समोरच्या परिस्थितीशी ते एकरूप होऊ शकत नाही. आपल्या शेतीची अवस्था पाहून वडिलधाऱ्या मंडळीचे काय हाल होत आहेत ते बघत असतात, आणि आपल्याला याच्या व्यतिरिक्त काही करता येईल का याचाही ते शोध घेत असतात परंतु. त्यांना तसे काही साध्य होत नसते. आता शेतीत काम करण्याची त्यांची इच्छाही नसते. आणि क्षमताही राहीली नसते. त्यांना शहरी आकर्षण वाटत असते. शेतात कष्ट करण्यापेक्षा शहरात जाऊन काहीतरी थोडाफार छोटा मोठा का होईना काहीतरी व्यवसाय करावा किंवा नोकरी पहावी याकडे कल झालेला आहे. थोडक्यात, आता शेतीत काम करणे कष्ट करणे हे त्यांना कमीपणाचे लक्षण वाटते आहे. आणि म्हणूनच वडीलधारी मंडळी शेतीला चिकटून असली तरी पण त्यांना कुटुंबातील मुलांची साथ मिळेल ही शक्यता नाही.



शहरातील रहाणीमान त्यांना आकर्षित करून घेत आहे.

अशा अल्प अत्यल्प तसेच कोरडवाहू शेती करणाऱ्या कुटुंबात मुला मुलीच्या लग्नाचे प्रश्न गंभीर होत आहेत. शेतीला आणि शेतकऱ्याला प्रतिष्ठा नसल्याने निव्वळ शेती असणाऱ्या घरात कोणीही आपल्या मुली द्यायला तयार होतं नाही. तर शेतीच्या उत्पन्नातून संसार, घर खर्च,शिक्षणाचा खर्च ही निघत नसल्याने मुलीच्या लग्नात देण्याघेण्याचा हुंडा विवाहाचा खर्च झेपत नसल्याचा प्रश्न उपस्थित होतो . मुलीचे लग्न ही रखडल्यामुळे अनेक कुटुंबात तरुण मुला मुलींनी आपले जीवन संपवले आहे. शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या लग्नाचे विषय खूपच गंभीर झाले आहेत. त्यातच कर्जाचा बोजा थकलेले कर्ज आणि कर्ज वसुली चा रेटा यामुळे शेतकरी अधिकच विचित्र परिस्थितीत सापडतो.

शेतकऱ्यांविषयी अनेक वादग्रस्त आणि शेतकऱ्यांचा अवमान करणारी विधाने केली जातात. शेतकरी कर्जमाफीची रक्कम साखरपुडा,लग्नासाठी खर्च करतो. त्यातील एक रुपया तरी शेतीला लावतो का ?असे वक्तव्य कृषी मंत्र्यांनी केले होते. आता भिकारी ही एक रुपया घेत नाही आम्ही एक रुपयात पिक विमा घेतो असेही वक्तव्य केले होते. आता भिकारी आणि शेतकरी हे वक्तव्य काय आहे? काहीतरी असंबद्ध प्रकारचे वक्तव्य आहे.अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची कृषी मंत्री कोकाटे यांनी पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलत असतानाच त्यांनी हे वक्तव्य केले. मंत्री, कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय होणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का? जे नियमात बसेल त्याप्रमाणे करा पण किमान शेतकऱ्यांना डिवचवू नका आणि अपमान कारक बोलू नका.त्याच्याविषयी सवेदनशीलता असू द्या. शेतकऱ्यांशी बोलताना त्रासिक पणे बोलू नका. या आधी सुध्दा एका राजकीय नेत्याने कितीही दिले तरी रडतात साले असे शेतकऱ्यांनचा अवमान करणारे वक्तव्य राजकीय नेत्यांकडून केले जात आहे. कोणी आपल्या खिशातून काढून देत नाही.

अशातच पुन्हा एकदा बबनराव लोणीकर यांनी वादग्रस्त विधान केल्याने चर्चेत आले आहेत. यावेळी लोणीकरांची सरकारवर टीका करणाऱ्या तरुणांवर निशाणा साधताना जीभ घसरली आहे. तुझ्या अंगावरचे कपडे आणि पायातली चप्पल सुद्धा सरकार मुळेच तर तुझ्या घरात आईबहीणीला, बायकोला १५०० रुपये आम्हीच देतो. तुझ्या बापाला पेरणीसाठी सहा हजार रुपये मोदींनी दिल्याचं बबनराव लोणीकर म्हणाले. या विधानावरून विरोधक त्यांच्यावर टीका करत आहेत. जालना जिल्ह्यातील आपल्या परतूर येथील सोलर योजनेच्या शुभारंभ प्रसंगी केलेल्या भाषणात बोलताना लोणीकरांनी वादग्रस्त विधान केले आहे.

पक्ष कुठलाही असो परंतु त्यांनी शेतकऱ्या विषयी विधान करताना अतिशय जबाबदारीने करायला हवे. नाहीतर फक्त निवडणुका आल्या की त्याच्याविषयी कळवळा दाखवायचा,पाया पडायचे, आणि नंतर मात्र त्याला जितके अपमानित करता येईल तितके करायचे ही पद्धत झाली. आधी म्हणायचे शेतकऱ्याचा सातबारा होणार कोरा.. कोरा.. कोरा त्यानंतर मात्र ३१ मार्च अखेर पर्यंत शेतकऱ्यांनी कर्ज भरण्याचा सल्ला उप मुख्यमंत्री अजित पवार देतात. आता कर्जमाफी नाही, ज्यांनी कोणी आश्वासन दिले त्यांना विचारा असे विधान केले जाते.परत दुसरे उपमुख्यमंत्री म्हणतात जाहीर केल्या प्रमाणे कर्जमाफी होणारच. परत मुख्यमंत्री म्हणतात योग्य वेळी कर्जमाफी दिली जाईल. कोणाला द्यायची ठरवले जाईल. असे. आता योग्य वेळ कोणती आणि ती कधी येईल असा प्रश्न विचारला जात आहे.

गतवर्षी अतिवृष्टीने झालेले पिकांची नुकसान भरपाई किंवा त्यांना मदत अद्यापही मिळाली नाही. पिक विम्याचे पैसे ही मिळालेले नाही. नियमित कर्ज भरणाऱ्यांना पंचवीस हजार किंवा पन्नास हजार देणार असे जाहीर केले होते. त्याबाबतीत काही निर्णय होत नाही फक्त आशेवर झुलवले जाते.

मी स्वतः जवळपास सोळा वर्ष विशेष वसुली अधिकारी पदावर कामकाज केले आहे आणि त्यामुळे मी शेतकऱ्याचे असे अनेक प्रश्न आणि समस्या जवळून बघितल्या आहेत आणि त्याचा अभ्यास केला आहे. कर्ज बुडवण्याची शेतकऱ्याची मुळातच इच्छा नसते परंतु त्याला पिकत नाही आणि पिकले तर भाव मिळत नाही अशी कोंडी निर्माण करणारी अवस्था असते.

सध्या शहरी आणि ग्रामीण अशी एक दरी निर्माण झाली आहे अर्थातच ग्रामीण भागात शेतकरी आणि मजूर वर्ग तर शहरी भागात मध्यमवर्ग उच्च मध्यम वर्ग नोकरदार धनिक व्यापारी अशी विगत वारी झाली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या गरजा त्यामानाने खूपच कमी आहेत. बऱ्यापैकी माल व्हावा व त्याला भाव मिळावा आणि पुढच्या हंगामा पर्यंत आपले दिवस सुखाचे जावे हीच अपेक्षा असते. मर्यादित गरजा असतात. परंतु शहरीभागात हाय फाय राहणीमान असते, शेतकऱ्याच्या समस्यांशी त्यांना काही देणेघेणे नसते, फक्त त्याने पिकवावे आणि आपण खावे हीच भूमिका असते . दरवर्षी पगारवाढ, वेतनआयोग, दर वर्षा दोन वर्षांनी पर्यटनाची सवलत, सगळे व्यवस्थित असते. त्यांच्या एका शर्ट पॅन्ट,बुट, ची किंमती एवढी शेतकऱ्याला हेक्टरी मदत मिळत असते.

आपण आपले कुटुंब इतर गोष्टींशी त्यांना काही देणे घेणे नसते. वर्तमानपत्रात शेतकरी आत्महत्या करत असल्याच्या बातम्या ऐकतात आणि वरपांगी हळहळ दाखवतात.

शेतकऱ्याला मात्र ना पगारवाढ,ना वेतन आयोग,ना पर्यटन सवलत. त्याचे सर्व जीवन शेतीसाठी समर्पित असते.आणि त्याच्या समर्पण भावामुळे हे सर्व व्यवस्थित सुरू आहे. सरकार कुठल्याही पक्षाचे असेल,उगीच त्यांचा वेळोवेळी अपमान करून अपमानास्पद वागणूक देवू नका. आणि त्याला लाचार समजू नका.दर पाचवर्षांनी नवनवीन आश्वासन देउन तुम्हीच त्यांच्या दारात जातात.त्याची पुर्तता करा.आपण जनतेने सेवक आहोत याचा विसर पडू देवू नका. तो जगाचा पोशिंदा आहे. त्याचे मालक होवू नका.तोच मायबाप आहे. त्याला.. शेती व्यवसायाला, प्रतिष्ठा मिळवून द्या.आपल्याला हे वैभव,पद, प्रतिष्ठा तोच मिळवून देतो नां ? त्याला विसरु नका. त्याचे आशीर्वाद घ्या. तळतळाट घेउ नका.



शेतकरी टिकेल तर शेत पिकेल.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव. मोबा. ८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

# केलखाडी सारखी अनेक गावे अजूनही मुलभूत सुविधांपासुन वंचित का?

भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालेत त्याचबरोबर देशातील २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेशाचा विकास झाला.या राज्यात वेगवेगळ्या पक्षांचे सरकार आलेत आणि गेलेत.परंतू ते हेही सांगायला विसरले नाहीत की आम्ही विकास झपाट्याने केला असे नेहमीच सर्वच राजकीय पक्ष छाती ठोकून सांगतात. आपण महाराष्ट्राचा विचार केला तर अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु प्रत्येक राजकीय पक्ष स्वतःची पाठ थोपटण्यात अग्रेसर रहाला.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. आज महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येऊन ६५ वर्षे झालीत.परंतू आजही राज्यातील अनेक भागांत मुलभूत सुविधांपासुन अनेक लोक वंचीत आहेत.त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी गाव.आजही सरकार अती दुर्गम भागात पोचलीच नाही;जर पोहचली असेलही परंतु तेथील विकासाकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचे चित्र नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी (ता. अक्कलकुवा) येथील भयावह परिस्थिती वरून लक्षात येते.नंदुरबार जिल्ह्यातील आमदार खासदार,पालकमंत्री अशा उच्च पदस्थ लोकप्रतिनिधींना अशा गंभीर समस्या कशा काय दिसत नाही? किंवा दिसल्या नाहीत?मतदारांकडे मतदान मांगतांना या गावात कोणीच गेले नसेल का?गेले असेल तर फक्त स्वार्थापोटी गेले असावेत ही बाब तेथील गंभीर परिस्थितीवरून सर्वांच्याच लक्षात येते. नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी ता.अक्कलकुवा येथील पूल नसल्याने परिसरातील डोंगरपाड्यावरील विद्यार्थ्यांना दररोज झाडाच्या फांदीवरून दोरीच्या सहाय्याने तोल सांभाळुन जीव धोक्यात घालत पलीकडच्या जिल्हापरिषद शाळेत जावे लागते.या गावात ४०० लोकांची वस्ती आहे स्वतंत्रपूर्व काळापासून तेथे रस्ता नाही ही कीती मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.आज औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत आहे अशा परिस्थितीत डोंगराच्या पायथ्याशी किंवा शेजारी राहणाऱ्यां गावकऱ्यांना आपला जीव धोक्यात टाकून जगावे लागत आहे ही विकसित महाराष्ट्राची शोकांतिकाच म्हणावी लागेल.आज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात पाऊसाने थैमान घातले आहे अशा परिस्थितीत नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी ता.अक्कलकुवा येथील नदीवर पूल नसल्याने तेथील परिसरातील डोंगरपाड्यावरील विद्यार्थ्यांना दररोज जीव धोक्यात टाकून शिक्षणासाठी झाडाच्या फांदीवरून दोरीच्या सहाय्याने शाळेत जावे लागत आहे.म्हणजे शिक्षणासाठी चिमुकल्यांना कीती मोठा धोका पत्करावा लागत आहे ही बाब नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी गावातील जिवंत उदाहरण महाराष्ट्रासह देशासमोर आहे. विद्यार्थी तसेच ग्रामस्थांना केलखाडी गावात येण्यासाठी आधी डोंगर उतरून नदीकाठावर यावे लागते.त्यानंतर झाडांच्या फांदीवरून नदी पार करावी लागते.तेथील ग्रामस्थ म्हणतात की आमच्या पाड्यापर्यंत जाण्यासाठी धड रस्ता नाही.पलीकडे केलीपाडा येथे जाण्यासाठी नदीवर पूल नाही.त्यामुळे जीवघेणी कसरत रोजचीच झाली आहे.रस्ता आणि पुल बांधण्यासाठी ग्रामस्थ अनेक वर्षांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा करून मागणी करीत आहेत मात्र अजूनही ग्रामस्थांना प्रशासनाकडुन दाद मिळाली नाही याचे दुःख आजही त्यांना होत आहे.२० फूट खोल केलखाडी नदी व २४ फूट लांब झाडांचा रस्ता किती भयानक व कठीण परिस्थिती म्हणावी लागेल.मी या लेखाच्या माध्यमातून सरकारला व पक्ष-विपक्षांना आग्रह करतो की सध्या पावसाळी अधिवेशन सुरू आहे जर माझा आवाज या लेखाच्या माध्यमातून आपणापर्यंत पोहचला असेल तर आपण ताबडतोब नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी गावात जाऊन तेथील संपुर्ण परिस्थिती युध्दपातळीवर हाताळावी जेणेकरून तेथील ग्रामस्थांना व चिमुकल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दिलासा मिळु शकेल व त्यांचे जीवन आनंददायी होईल. त्याचल्यमाणे माननीय मुख्यमंत्री, स्थानिक प्रशासन, सरकार, आमदार -खासदार यांनी अती दुर्गम भागांची पहाणी करावी व संपूर्ण मुलभूत सुविधांची पूर्तता करून तेथील ग्रामस्थांना विकासाच्या प्रवाहात आणावे ही माझी सरकारला कळकळीची विनंती आहे.केलखाडीतील ग्रामस्थ व विद्यार्थी म्हणतात सांगा,आमची शाळेत जाण्याची समस्या कोणत्या भाषेत सांगावी! त्यामुळे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पुन्हा विनंती करतो की अशा दुर्गम भागाकडे आपण जातीने लक्ष द्यावे जेणेकरून तेथील ग्रामस्थांना दिलासा मिळेल.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## केंद्रीय प्राथमिक शाळा सावंगी तलाव येथे वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** सावंगी तलान ता. जि.जालना येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत हरितक्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितानी वसंतराव नाईक यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री विठ्ठल मेंढरे यांनी तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच प्रभू आप्पा रंधवे तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष अनिल राठोड त्याचबरोबर कचरू रंधवे, बाळु हरकळ, राजू डोंगरे ,अफरोज बागवान इत्यादी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रमोद साठेवाड ,प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रमोद पवार तर आभार प्रदर्शन श्रीमती अश्विनी पाटील यांनी केले

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**परतूर । प्रतिनिधी -** येथील माजी आ.सुरेशकुमार जेथलिया यांच्या संपर्क कार्यालयात दि.०१/०७/२०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी आ.सुरेशकुमार जेथलिया, प्रदेश सरचिटणीस बळीरामजी कडपे, युवक प्रदेश सरचिटणीस,नितीन जेथलिया, अंल्पसंख्याक सेल प्रदेश उपाध्यक्ष, खय्यूम खान पठाण,बाबासाहेब गाडगे,हाजी रहेमत खान, डॉ. जगताप,विजय कडपे,एम एल कुरेशी,गौतम शेळके,किशोर राठोड,अमोल रामवत, अनंता भारसाकळे,शोएब पठाण,राम राठोड यांची उपस्थीती होती.

## परतुर तालुक्यातील ब्रम्हवडगाव येथे सेवापुर्ती गौरव सोहळा



**परतूर । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद प्रशाला ब्रम्ह वडगाव येथे दि.०१ जुलै रोजी प्राथमिक पदवीधर, दादाराव पंडितराव राऊत यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा साजरा करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष,खांडवीचे सरपंच, अशोकराव बरकुले प्रमुख मान्यवर, एस. बी. देशमाने, के. एन. टोन्पे, परतूरचे बीईओ, अशोक सोळंके, शेषराव वायाळ. नामदेव धुमाळ, कल्याण बागल, तरवटे बाबासाहेब, पतंगराव चांदराव, प्रल्हाद धुमाळ, यांच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा करण्यात आला. याप्रसंगी शिक्षीका बाहेकर, आदमंवाड, विद्यार्थ्यांनी व नागरिक यांनी दादाराव राऊत यांच्या गौरवार्थ भाषण केले.कार्यक्रमाचे सुत्र संचालन आर.के.गिरी यांनी केले.

## बच्चु कडू यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम राबविणार- शंकर शिरगुळे

**जालना । प्रतिनिधी -** प्रहार संघटनेचे नेते बच्चु कडू यांचा येत्या शनिवार (दि ५) रोजी वाढदिवस आहे. यानिमित्ताने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकर शिरगुळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, बच्चु कडू यांच्या वाढदिवसानिमित्त रेल्वे स्टेशन जालना परिसरात असलेल्या दिव्यांग निवासी शाळेत शनिवार (दि ५) रोजी फळ वाटप करण्यात येणार आहे. त्याच बरोबर जालना येथील सामान्य रुग्णालय परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहनही श्री शिरगुळे यांनी यावेळी केले आहे.

## वाचकांचे मनोगत

### हयातीतच् लाभ मिळणे हाच हयातोपाय !

गिरणी कामगार संघर्ष समितीचे कॉ.विठ्ठल घाग यांच्या अमृतमहोत्सवनिमित्तच्या ' उर्जा पर्व ' पुस्तकात ' गिरणी कामगारांना घरे देताना कामगार ती घरे विकून टाकतील ' असा टिकेचा मुद्दा अडथळा म्हणून वेळोवेळी उपस्थित केला जातो त्याला ..... ' विकली तरी काय हरकत आहे ! ज्यांनी आपले नोकरीसह सर्वस्व गमावले आहे, त्यांच्या हातात जगण्यासाठी काहीतरी साधन मिळावे ' असे जे प्रत्युत्तर दिले ते यथायोग्यच् आहे. आणि याला जवाबदार आतापर्यंत केवळ मृगजळी आश्वासन देणारे सत्तारुढ शासनच् होय ! या मृगजळी घरांबाबत इतकी वर्षे कालहरण झाले आहे की, लढ्याचा प्रारंभ कधी झाला हे काही महिन्यांनी ऋषिंचे कूळ शोधण्यासम परिस्थिती ठरावी. शिवाय दरम्यान असंख्य गिरणी कामगार निवर्तले ही वस्तुस्थिती ! आणि जे काही हयात आहेत त्यांनी सत्तरी पार केल्याने प्रकृती कारणास्तव त्यांना घर मिळण्यात स्वारस्य नाही. त्यांना सद्या गरज आहे दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या वैद्यकीय खर्चासाठीच्या निधीची ; आणि ज्याप्रकारे आतापर्यंतच्या सत्ताधाऱ्यांकडून चालढकल सुरु आहे त्यानुसार या हयातीत तरी त्यांना घरं मिळणे अशक्यच् ! शिवाय जर, जेव्हा (?) जादुईपणे घर मिळाले तर घर किंमतीतील आर्थिक हिस्सा अधिक नंतर दरमहा अवास्तव देखभाल खर्चाचा राक्षस मानगुटीवर बसण्याचे दृश्य डोळ्यासमोर सतत आहेच् ! तेव्हा घराऐवजी कामगारांच्या हिस्स्याची रक्कम वगळून उर्वरित रक्कम ' हयात ' कामगारांना देऊन शासनाने आपले ' उत्तरदायित्व ' कमी करावे ; जेणेकरुन ' हयात मूळ गिरणी कामगारांना ' त्यांच्या हयातीतच् लाभ मिळणे हाच् हयातोपाय !

**- किरण प्र.चौधरी, दहिसर, मुंबई.**

## पान १ वरुन

### महाविद्यालयात शिकवणी ...

पडताळण्यासाठी महाविद्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात यावेत, ज्या महाविद्यालयाच्या तक्रारी झाल्या आहेत त्यांच्या महाविद्यालयातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी आणि स्वाधार योजनेचे लाभार्थी यांची यादी मागवून त्यांच्यातील बोगस विद्यार्थी शोधावेत. शिवाय त्यांच्या १० वी आणि १२ वीच्या गुणपत्रीकेवरच्या गुणाची माहिती परिक्षा महामंडळाकडून मागविण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. जालना शहरात किंवा शहराच्या ५ किमी अंतराच्या आत महाविद्यालय असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाच स्वाधार योजनेचा लाभ दिला जातो. मात्र सामाजिक न्याय विभागातील अधिकारी आणि काही कर्मचारी यांना हाताशी धरुन जे महाविद्यालय जालना शहरापासून ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर आहेत त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देखील स्वाधारचा लाभ दिल्या जात आहे. त्यामुळे अशा महाविद्यालयाच्या संचालकावर आणि प्राचार्यावर देखील गुन्हे दाखल करण्यात यावेत.

सामाजिक न्याय विभागात तक्रार केल्यानंतर बोगस प्रकार झाकून ठेवण्यासाठी ज्या महाविद्यालयाच्या संचालक आणि प्राचार्यांनी खंडणी दिली. त्यांच्या महाविद्यालयाची देखील चौकशी करुन त्यांचे ऑडीट, विद्यार्थी पटसंख्या तपासून त्यांनी कोणत्या खात्यातून खंडणीची रक्कम दिली त्याची चौकशी करावी व महाविद्यालयाच्या खात्यातून पैसे दिले असल्यास महाविद्यालयाच्या खात्याचा दुरुपयोग केला असल्याचे निष्पन्न होते. त्यामुळे महाविद्यालयाच्या बँक खात्याचा तपशील आणि त्यांच्या वैयत्तीक खात्याचा तपसीलाची चौकशी करुन त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावेत. खंडणी देऊन प्रकरण झाकून ठेवण्याचा प्रयत्न केला असल्याने त्यात काहीतरी काळे-पांढरे असावे असा संशय आहे. असा संशय दिपक बोर्डे यांनी दिलेल्या तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे.

### रोटरी मिडटाऊन ...

सहकार्याने आणि आता का परिश्रमातून तीन दिवसात या प्रकल्पाला मूर्त रूप प्राप्त झाल्याचे सांगितले. कार्यक्रमाला रोटरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुजाता नानावटी यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार सचिव गौरव मोदी यांनी मानले. या प्रकल्पासाठी परिश्रम घेणाऱ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**सेवा कार्याचा प्रारंभ व समारोप मातेच्या सानिध्यात - सागर दक्षिणी**

प्रास्ताविकपर भाषणात रोटरी क्लब जालना मिडटाउनचे अध्यक्ष सागर दक्षिणी म्हणाले की, आमच्या कार्यकाळाचा शुभारंभ देव मूर्ती येथील भवानी माता मंदिर परिसरात वृक्षारोपणाने करण्यात आला आणि समारोपदेखील माता दुर्गादेवीच्या सानिध्यात 'रोटरी मिडटाऊन कट्टा' यांना नाविन्यपूर्ण उपक्रमाने होत आहे. ६५ वर्षाच्या जालना रोटरीच्या इतिहासात ९ वर्षापूर्वी स्थापन झालेल्या रोटरी मिडटाऊनने यावर्षी जलसंवर्धन, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, शिक्षण, सामाजिक उपक्रम आदी सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक काम केल्याने एक पब्लिक इमेज निर्माण केल्याचा आपणास सार्थ अभिमान आहे. सर्वांच्या सहकार्याने आम्हाला हे कार्य करणे शक्य झाल्याचे सांगून, एक वर्षाच्या आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळावर आपण समाधानी असल्याचे ते म्हणाले.

### शासन निर्णय ...

परतफेड, रोख स्वरूपातील शुल्क घेणे बंद करणे, शासनमान्य ऑनलाईन प्रणालीद्वारे पारदर्शक शुल्क प्रक्रिया, पावत्या योग्य स्वरूपात, णऊखडए नंबरसहित द्याव्यात, प्रवेश फॉर्म शुल्क पूर्णतः रद्द करावे., शिवश्री बाळासाहेब खवणे सर यांनी सांगितले की- विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या व्यवस्थेला गप्प बसून पाहणार नाही. शासन निर्णय डावलून जर ही लूट चालूच राहिली, तर संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरून आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही., वसूल केलेली सर्व फी परत करावी, अवैधरित्या फिस वसुली थांबवावी,रोख व्यवहार थांबवावेत आणि शासनमान्य प्रणालीनुसार पारदर्शक प्रक्रिया राबवावी, अशी मागणी करत अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ब्रिगेडने दिला आहे.

# पालकांनो, आपल्या मुलींना नका देऊ श्रीमंत घरी!

आजकाल बहुतांश पालकांना मुलीसाठी मुलगा कसा हवा आहे? हा प्रश्न जर विचारला तर प्रत्येक पालकाचे उत्तर हेच असेल की, मुलगा चांगल्या नोकरीला असावा, त्याच्याकडे भरपूर पैसा व संपत्ती असावी, राहण्यासाठी आलिशान बंगला असावा, त्याला भरपूर शेती आणि फिरायला चारचाकी गाडी असावी, पुणे व मुंबई सारख्या नामांकित ठिकाणी त्याचे प्लॉट असावे. तो सर्व आर्थिक बाजूंनी भक्कम असावा अशा श्रीमंत मुलालाच मी माझी मुलगी देणार, हे प्रत्येक पालकांचे ध्येय बनले आहे. त्यासाठी जवळच्या पाहुण्यांना व नातेवाईकांना आपल्या मुलीसाठी चांगले स्थळ बघा म्हणून ते सांगतात. जोपर्यंत मुलीला चांगले स्थळ भेटत नाही, तोपर्यंत त्यांना सुखाची झोप सुद्धा लागत नाही. अहोरात्र त्यांना एकाच गोष्टीचा ध्यास लागलेला असतो, तो म्हणजे माझ्या मुलीला श्रीमंत स्थळ मिळावे, माझ्या मुलीला नोकरदार मुलगा मिळावा, जेणेकरून माझी मुलगी आनंदात व सुखात नांदेल. म्हणून बहुतांश पालक तसा श्रीमंत मुलगा शोधण्यासाठी जीवाचे रान करतात. त्यांना तो मुलगा वागायला, बोलायला व दिसायला कसाही असला तरी चालतो, फक्त तो श्रीमंत असावा, मुलीला घराच्या बाहेर काढणारा नसावा, मुलीला जीवापाड जपणारा असावा, म्हणून ते चारचौघात गेल्यावर, कोणाच्या कार्यक्रमात गेल्यावर, मित्रांमध्ये बसल्यावर किंवा कुठेही चर्चेत गेल्यावर ते आपल्या मुलीसाठी चांगले स्थळ विचारतात. बसने प्रवास करत असताना माझ्या समोरील बाकावर दोन प्रवासी बसले होते. त्यात एक प्रवासी वयोवृद्ध होता तर एक प्रवासी तरुण होता, त्यांच्या आपसी बोलण्यावरून ते दोघे नातेवाईक असल्याचे समजले. त्या तरुणाला एकुलती एक मुलगी असून तो मुलीसाठी चांगले स्थळ पाहण्याच्या शोधात हिंडत होता. तेव्हा त्या तरुणाने त्या आजोबांना माझ्या मुलीसाठी कुठे चांगले स्थळ असेल तर कळवा म्हणून सांगितले. तेव्हा ते आजोबा म्हणाले की, बाळा तुझ्या मुलीसाठी मी चांगले स्थळ बघतो, पण तुला मुलगा कसा हवा आहे? त्या मुलाकडून तुझ्या अपेक्षा काय आहेत? मुलगा गरीब घरातील असावा की, श्रीमंत घरातील? तेव्हा तो तरुण त्या वयोवृद्ध आजोबांना म्हणाला की, माझ्या मुलीला श्रीमंत व नोकरदार मुलगा हवा आहे, त्याच्याकडे भरपूर पैसा व संपत्ती असावी, नोकरचाकर असावेत, आलिशान गाडी व आलिशान बंगला असावा, भरपूर शेती व संपत्ती असावी, तो दिसायला सुंदर असावा आणि त्याचे मोठ्या शहरात प्लॉट असावे, असे तो त्या आजोबांना म्हणतो आणि मुलीसाठी मी कितीही हुंडा द्यायला तयार आहे, असे ठणकावून सांगतो. पण तेवढ्यात गाव येते आणि बस थांबल्यावर ते आजोबा गाडीतून खाली उतरतात. आणि आपल्या घराच्या दिशेने निघतात. मुलाने त्या आजोबांना केवळ श्रीमंत मुलगा शोधा म्हणून सांगितले पण त्याची वर्तणूक, त्याचे राहणीमान, त्याचे चारित्र्य, संस्कार, त्याचे व्यक्तिमत्व आणि व्यसन यावर तो काहीच बोलला नाही.याचा अर्थ असा की, मुलगा कसाही असला तरी चालतोय, पण तो खूप श्रीमंत, नोकरदार, जमीनदार, पैसेवाला आणि गाडी व बंगला असणारा असला पाहिजे, अशी भावना आजकाल सर्वच लोकांची होऊन बसली आहे. पालकांनो तुम्हाला राग आला तरी चालेल, पण मी खरं सांगतोय की, आजकाल मुलींचे लग्न मुलाच्या बंगल्याकडे व श्रीमंतीकडे बघून न जमवता आपली मुलगी त्या घरात सुखाने व आनंदाने राहील का? हा विचार करून प्रत्येकाने आपल्या मुलीचे लग्न लावले पाहिजे. मग तो मुलगा श्रीमंत घरातील असो किंवा गरीब घरातील असो, तो आपल्या किती सुखी ठेवतो? याचा विचार करून आजकालच्या मुलींनी लग्नास तयारी दर्शवली पाहिजे. नसेल तर आयुष्यभर अविवाहित राहिलेले बरे. असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. त्यासाठी मुलगा व्यसनी नसावा, दारू व गांजा पिणारा नसावा, गरीब व होतकरू असावा, मुलीला जीवापाड जपणारा असावा, मटका व पत्ते खेळणारा नसावा, त्याला कोणतेच वाईट व्यसन नसावे, तो उच्चशिक्षित व चारित्र्यसंपन्न असावा तरच त्या घरात मुलीला सुखाची व समाधानाची झोप लागेल. आणि चांगले व सुखद आयुष्य जगण्याचे भाग्य मिळेल. मुलीच्या संसाराचा गाडा सुरळीत चालेल, म्हणून पालकांनो मुलीला श्रीमंत घरी देण्यापेक्षा गरीब परंतु, सुखी घरी देण्याचा विचार करावा. श्रीमंत घरातील अनेक मुलींना पतीच्या व सासू-सासर्याच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करावी लागली आहे. कदाचित तुमच्यावर देखील ती वेळ येऊ शकते. म्हणून अगोदरच विचार करून लग्न केलेले बरे. मोठ्या घरापेक्षा गरीब घरात राहणाऱ्या मुली सुखी व आनंदी जीवन जगतात. पण बहुतांश पालकांना मुलगी श्रीमंत घरी दिली म्हणजे सुखी जीवन जगेल, तिला कशाचीच उणीव भासणार नाही, सुख तिच्यापुढे गोंडा घोळायला लागेल असा गैरसमज झालेला आहे. म्हणून पालक आपल्या मुलींना श्रीमंताघरी देण्याचा विचार करत आहेत. मान्य आहे की,आपण आपल्या मुलीला श्रीमंत व मोठ्या घरी द्याल पण मुलगा दारुडा असो, मटका लावणारा असो, पत्त्याचा डाव मांडणारा असो, भांडकुदळ व मवाली असो, चारित्र्यहीन व अमानुष असो, दारू पिऊन आई-वडिलांना मारणारा असो किंवा वाईट मार्गाने पैसा मिळवणारा असो, आपल्याला चालतो पण गरीब व साध्या घरातील सुसंस्कारी, निर्व्यसनी, उच्चशिक्षित, होतकरू, शेतकरी, चारित्र्यवान आणि गुणवान मुलगा त्यांना नको वाटतो. कारण या घरात मुलीला हायफाय संस्कृतीचा उपभोग घेता येत नाही. म्हणून मुलीच्या प्रत्येक बापाला वाटत असते की, गरीब घरातील सासू-सासरे मुलीला शेतातील कामे करायला लावतील, घरातील धुनी व भांडी घासायला लावतील, मुलीला भौतिक सुखाचा कसलाच आनंद घेता येणार नाही. म्हणून बहुतांश पालकांना मुलगी गरिबाघरी देणे नको वाटते. श्रीमंताघरी मुलीला कष्टाची कामे करावी लागत नाहीत. असे पालकांना वाटते. पण मला असे वाटते की, मुलीला गरिबाघरी कदाचित कष्टाची कामे करावे लागत असतील पण गरीब घरातील मुलीएवढे सुखी व आनंदी जीवन श्रीमंत घरातील मुली कधीच जगू शकत नाहीत. आणि गरिबाघरच्या मुलींना जेवढी सुखाची झोप लागते, तेवढी सुखाची झोप श्रीमंत घरातील मुलींना कधीच लागत नाही. श्रीमंताच्या घरी जराही सुखाची छाया नसते, रोज कोणत्या ना कोणत्या कारणावरून त्यांच्यात भांडणतंटे होतात. हे सर्व माहीत असून सुद्धा केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी मुलींना श्रीमंत घरी देऊन पालक मुलीचे वाटोळे करत आहेत.कारण आजकाल मुलगी श्रीमंताघरी देणे समाजात प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे. प्रत्येकजण सामाजिक प्रतिष्ठेसाठी म्हणा किंवा वैयक्तिक मोठेपणासाठी म्हणा आपल्या मुलीला श्रीमंताघरी देण्याचा प्रयत्न करत आहे. मुलीला श्रीमंताघरी देण्यासाठी प्रत्येक भावकीत, समाजात व गावात जणू एक प्रकारची स्पर्धाच लागली आहे. परिस्थिती कितीही गरीब असूद्या, आपल्या डोक्यावर कितीही कर्जाचा भार होऊ द्या, अंगावरील दागदागिने जाऊ द्या, नाहीतर एक दोन एकर शेती जाऊ द्या, पण मुलीला श्रीमंताघरी देण्यासाठी पालक जराही मागे हटत नाहीत. मुलाच्या मनावर म्हणेल तेवढा मनमानी हुंडा द्यायला तयार असतात. त्यांना पैसा गेल्याचे जराही दुःख वाटत नाही. आपल्या डोक्यावर किती कर्ज झाले? वेळेवर त्या पैशाची परतफेड करता येईल का? याचा ते जराही विचार करत नाहीत. फक्त आपली मुलगी श्रीमंताघरी जावी आणि आलिशान बंगल्यात राहावी, हा विचार प्रत्येक मुलीच्या बापाचा असतो. पण आई-वडिलांना हे कसे कळत नाही, की मुलगी श्रीमंत घर पाहून न देता, सुखी घर पाहून द्यायची असते. मुलगी श्रीमंत घरी द्या किंवा गरीब घरी द्या, याला माझा विरोध नाही. पण ज्या घरात सुखी व सुसंस्कारी वातावरण आहे आणि मुलगा सुशिक्षित, होतकरू व निर्व्यसनी आहे, अशाच घरात आपण आपली मुलगी दिली पाहिजे. पण आजकाल पालक हा विचार करतच नाहीत. मुलगी श्रीमंत घरीच द्यायची हा हट्ट धरून बसतात. पण श्रीमंताघरी आपली मुलगी खरंच सुखी राहील का? मोप मुलगा श्रीमंत आहे हो, पण तो व्यसनी निपजला आहे. मग अशा व्यसनी मुलाला मुलगी देऊन काय फायदा? तो मुलगा खरंच पत्नीला सुखी ठेवेल का? तिच्यासोबत पती-पत्नीच्या नात्याने राहील का? या प्रश्नांचा विचार केल्यावर मला तर असे वाटते की, व्यसनी मुलगा पत्नीला कधीच सुखी ठेवणार नाही. तिच्यासोबत प्रेमाने व आपुलकीने वागणार नाही. कारण असा व्यसनी मुलगा रोज दारू पिऊन येतो आणि घरात भांडणतंटे करतो, पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ करतो, पत्नीला हुंड्याची मागणी करतो, आई-वडिलांचे ऐकून पत्नीसोबत वादविवाद करतो, पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतो, तुझ्या आई वडिलांना मला पैसे पाठवायला सांग, नाहीतर तू तुझ्या बापाकडे जाऊन रहा, म्हणून पत्नीला बेदम मारहाण करतो, पत्नीला जराही शारीरिक व मानसिक सुख देत नाही, रोज तिला टोमणे मारून बोलतो, घरातील व शेतातील सर्व कामे तिलाच करायला लावतो, तिला आई-वडिलांच्या आदेशाप्रमाणे वागायला सांगतो अशा मुलाला मुलगी देणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतल्यासारखे आहे. आपल्याच हाताने आपल्याच मुलीचे वाटोळे केल्यासारखे आहे. म्हणून मुलीला मुलगा शोधताना, गाडी, बंगला, पद, पैसा व संपत्ती बघत बसू नका. मुलगा कसा आहे? त्याच्या घरातील वातावरण कसे आहे? मुलगा व्यसनी आहे का? मुलाला कोणते वाईट छंद आहेत? मुलगा काय काम करतो? आपल्या मुलीला सुखात ठेवेल का? त्याचे चारित्र्य कसे आहे? त्याच्यात माणुसकीचे गुण आहेत का? आई-वडिलांच्या मर्जीप्रमाणे वागतो का? या सर्व प्रश्नांचा विचार करूनच आपण पुढील पाऊल उचलावे. नाहीतर आपण आजकाल पाहत आहोत, बंगला बांधला हायफाय पण सुखाचा पत्ता नाही, मुलगी दिली मोठ्या घरी आणि जाचाला कंटाळून काही दिवसातच तिने आत्महत्या केली, मुलगी दिली अधिकाऱ्याला मुलीचा छळ पाहून बाप तिला घरी घेऊन आला, अशा आशयाच्या अनेक बातम्या वर्तमानपत्रांमध्ये रोज प्रकाशित होत आहेत. श्रीमंत घरी दिलेल्या मुली कुठेच सुखी नाहीत. त्या हुंडाबळीच्या शिकार होत चालल्या आहेत. त्यांचा शारीरिक व मानसिक छळ केला जात आहे. त्यांच्या भावना दुखावल्या जात आहेत. त्यांना सन्मानाची वागणूक दिली जात नाही. तिला गुलामासारखे वागवले जाते. हे कालपरवा नुकत्याच घडलेल्या वैष्णवी हगवणे प्रकरणावरून आपल्या लक्षात आले असेल. म्हणून पालकांनो, आपली मुलगी नका देऊ श्रीमंताघरी!

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# व्यवसाय अपडेटसाठी २० जुलैला छत्रपती संभाजीनगरमध्ये व्यापार परिषद

## मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचा २८ वा वर्धापन दिन

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाड्यातील आठ लाख व्यापारी वर्गांचे प्रतिनिधित्व करणारी एकमेव संस्था ,मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्स च्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त २० जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर येथे व्यापार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेस चेंबरचे सदस्य तसेच जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील निवडक पदाधिकाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या परिषदेत मराठवाड्यातील ३०० प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर विचार मंथन होऊन ठोस ठराव मांडले जाणार आहेत. त्यामध्ये स्वतंत्र व्यापार मंत्रालय स्थापन करण्याची मागणी तसेच व्यवसाय कर रद्द करण्यासंबंधीचा ठराव, वन नेशन वन टॅक्स व वन रेटचा फायदा थेट ग्राहकापर्यंत पोहोचवणे, ग्राहकभिमुख बाजारपेठेसाठी पोषक वातावरण निर्मिती करणे, प्रत्येक जिल्ह्यात व्यापाऱ्यांच्या समस्यांवर मोकळा संवाद, महाराष्ट्रात इतर राज्यापेक्षा जास्तीचे असणारा विजेचा दर अशा विविध विषयांवर चर्चा होऊन ठोस ठराव मांडले जाणार आहेत. हे संमत झालेले ठराव राज्य व केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून मान्यता घेतली जाणार आहे. या परिषदेस जिल्हा व गाव पातळीवरील पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपाल सिंग छाबडा, माजी अध्यक्ष प्रफुल्ल मालानी,महासचिव शामसुंदर लोया , कोषाध्यक्ष विकास साहुजी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत राठी, गजानन घुगे सूर्यकांत हाके पाटील, संजय मोदानी, सचिव संतोष कावळे पाटील, जफर मिर्जा, सहसचिव संजय दाड, संदीप लाहोटी यांनी केले आहे.



**आगामी काळात रोजगाराच्या मुबलक संधी - लोया**

टोयोटो, किर्लोस्कर, एथर एनर्जी, जेएसडब्ल्यू, ग्रीन मोबिलिटी, लुब्रिझोल, एम्ब्रिको, मेटलमन ग्रुप अशा आघाडीच्या उद्योग समूहांनी डीएमआयसी मधील शेंद्रा आणि बिडकीन औद्योगिक वसाहतीत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे आगामी काळात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर वाढणार असून, स्थानिक व्यापारातही लक्षणीय वाढ होणार आहे. हाच बदल व्यापाऱ्यांसाठी सुवर्णसंधी ठरणार आहे. त्याला सुसंगत राहण्यासाठी आपल्या व्यवसायाला अपडेट करणे जरुरीचे आहे. याच पार्श्वभूमीवर मराठवाडा व्यापारी परिषदेत २० जुलै रोजी मंथन होणार आहे.

# वाहनावर सुधारीत कर आकारणार

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** गृह विभाग यांच्या अधिसुचनेद्वारे मोटार वाहन कर सुधारणेसाठी तरतुद केल्याप्रमाणे दि. १ जुलै २०२५ पासून वाहनावर सुधारीत कर लागु करण्यात आले आहेत. वाहनावरील सध्या लागू असलेला कर व सुधारीत कर याविषयी खाली दिल्याप्रमाणे बदलेले आहेत.




सीएनजी किंवा एलपीजी वर चालणारी खाजगी संवर्गातील दुचाकी व चारचाकी वाहने यासाठी सध्या असलेला कर वाहनाची किंमत रुपये १० लाखापर्यंत असेल तर सध्याचा कर ७ टक्के एवढा आहे यावर सुधारीत कर हा ८ टक्के आकारला जाईल. वाहनाची किंमत रुपये २० लाखापर्यंत असेल तर सध्याचा कर ८ टक्के एवढा आहे यावर सुधारीत कर ९ टक्के आकारला जाईल. वाहनाची किंमत रुपये २० लाखापेक्षा जास्त असल्यास सध्याचा कर ९ टक्के एवढा आहे यावर सुधारीत कर १० टक्के इतका राहील. बॅटरीवर चालणारी मोटार वाहनासाठी जर वाहनाची किंमत ३० लाख रुपये पेक्षा अधिक असेल तर वाहनाच्या किंमतीच्या ६ टक्के इतका कर आकारला जाईल.

क्रेन्स कॉम्प्रेसर्स, प्रोजेक्टर्स किंवा खनित्रे यासारखी बांधकामाकरीता वापरली जाणारी कोणतीही मोटार वाहने यासाठी सध्याचा कर वाहनाच्या युडब्ल्यू किंवा जीव्हीडब्ल्यू वजनावर वार्षिक कर असतो सुधारीत कर मोटार वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के एकरकमी आकारला जाईल.

ओझे लादलेले असतांना ज्यांचे नोंदणीकृत वजन ७५०० किलोग्रॅम अधिक नसेल अशी माल किंवा सामग्री यांची वाहतूकीकरीता वापरली जाणारी हलकी मालवाहतूक वाहने यासाठी सध्याचा कर वाहनाच्या युडब्ल्यू किंवा जीव्हीडब्ल्यूवजनावर वार्षिक कर असतो सुधारीत कर मोटार वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के एकरकमी आकारला जाईल. वरील सर्व कर हे दि. १ जुलै २०२५ पासून लागू होत आहे. तरी सर्व वाहन धारक, वाहतूक संघटना यांनी वरीलप्रमाणे सुधारीत कराची नोंद घेण्याचे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# भगवंतास धरून संसार केला तर संसारात काहीच कमी पडणार नाही - हभप गणेश महाराज जाधव

**जालना । प्रतिनिधी -** प्रत्येक नरदेह हा संसारात आपले जीवन समर्पण करतो परंतु ते सफल करण्यासाठी भगवंतांस शरण गेले पाहिजे जो भगवंतास धरून संसार करतो त्याच्या संसारात काहीच कमी पडत नाही असे प्रतिपादन हभप गणेश महाराज जाधव यांनी जालना शहरातील श्री आनंदी स्वामी महाराज यांच्या वार्षिक उत्सवातील कीर्तनात बोलतांना केले.

पुढे बोलतांना महाराज म्हणाले की जीवनातील भावसागर पार करण्यासाठी देवाला शरण गेले पाहिजे देवाला शरण गेले तरच जीवनाचे सार्थक होते, माणसाने माणसासारखे वागले तर देवाशी शरण गेल्यासारखे पुण्य लाभते. कायाने, वाच्याने, मनाने, भगवंतास शरण गेले पाहिजे कोणास शरण जावे हे ज्ञान फक्त नरदेहास असते नरदेह मिळणे सोपे नाही त्यासाठी सकाम भक्ती लागते माणसाच्या जीवनात अर्धे पुण्य अर्धे पाप झाले तर पुन्हा नरदेह मिळतो मानवी नरदेह हे जीवनाचे कल्याण करण्याचे द्वार आहे, मानवी नरदेह हा भगवंताच्या भक्तीने सार्थक होतो, माणसाचे वर्म चुकले तर त्याची फटफजिती होते जीवनाचे सार्थक करण्याची संधी प्रत्येकास जीवनात येते परंतु त्या संधीचे सोने करता आले पाहिजे असे ह भ प जाधव महाराज यांनी कीर्तनातून बोलतांना सांगितले.



यावेळी पखवाज साथ संगत हभप विठ्ठल महाराज काळे, तबला साथ संगत जय महाराज कराड, गायन साथ संगत हभप सुरेश महाराज मोहिदे, राजू महाराज गव्हाणे, भीमराव महाराज खरसाडे, ज्ञानेश्वर महाराज मोहिदे किरण महाराज चोरमारे, यांच्या भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# भाजपाचा सामान्य कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष; रवींद्र चव्हाण

सामान्य कार्यकर्ता, भारतीय जनता युवा मोर्चा उपाध्यक्षपदा पासून राजकीय कारकिर्दीला सुरवात केलेले रवींद्र चव्हाण यांची जगातील सर्वात मोठ्या व सत्ताधारी पक्षाचे प्रदेश अध्यक्षपदी निवड होत आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा परिचय...

डोंबवली या शहरात कोणतीही राजकीय पाठबळ नसताना सामान्य कार्यकर्ता म्हणून रवींद्र चव्हाण यांची राजकीय कारकीर्द भारतीय जनता युवा मोर्चा मध्ये युवक कार्यकर्ता म्हणून सुरवात झाली. चव्हाण यांना तळावरील कार्यकर्ता आणि स्वच्छ प्रतिमा असलेले राजकारणी म्हणून व्यापकपणे ओळखले जाते. माध्यमांच्या कव्हरेजमधून त्यांचे मजबूत संघटनात्मक कौशल्य, भाजपच्या सर्वोच्च नेतृत्वाशी तसेच देवेंद्र फडणवीस यांचे सोबत जवळचे संबंध आणि आश्वासने पूर्ण करण्याची त्यांची क्षमता दिसून येते . त्यांच्या नम्रता, सुलभता आणि सार्वजनिक सेवेतील वचनबद्धतेसाठी त्यांचा आदर केला जातो. त्यांना दादा म्हणून ओळखलं जात.

**राजकीय कारकीर्द**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत नगरसेवक व स्थायी समितीचे अध्यक्ष झाले. नगरसेवक असताना, चव्हाण २००९ मध्ये डोंबिवली विधानसभा मतदारसंघातून पहिले विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले,२०१४ आणि २०१९, २०२४ मध्ये चव्हाण यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका जिंकल्या. २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत त्यांनी महाराष्ट्रातील कोकण प्रदेशात सर्वाधिक मते मिळवून विजय मिळवला. २०१६ मध्ये त्यांना महाराष्ट्र सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांच्याकडे बंदरे, माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि अन्न, नागरी पुरवठा मंत्री तसेच रायगड पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. भारतीय जनता पार्टी चे महाराष्ट्र सरचिटणीस म्हणून नियुक्त करण्यात आले. शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाची जबाबदारी होती. पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त केले.

**आमदार म्हणून कार्य**

चव्हाण यांनी कल्याण डोंबवली महानगर पालिका अधिकाऱ्यांसोबत कायदेशीर समस्या सोडवून नोकरीवरून काढून टाकण्याच्या धोक्यात असलेल्या २८५ कामगारांची पुष्टी करण्यास मदत केली. त्यांनी यापूर्वी २००७ मध्ये या कामगारांसाठी पगारवाढीची वकिली केली होती. कल्याण पश्चिम येथे ४०० हून अधिक रहिवाशांसह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या १.५ किमी गोविंदवाडी बायपास पूर्ण करण्यास झालेल्या विलंबाच्या विरोधात निदर्शने केली. जामीन नाकारल्यानंतर, त्यांना तुरुंगात टाकण्यात आले आणि मुंब्रा-डोंबिवली रस्त्यासह रखडलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर कारवाई करण्याची मागणी करण्यासाठी त्यांनी उपोषण सुरू केले. डोंबिवलीतील पायाभूत सुविधांच्या समस्या सोडवण्यासाठी मुंबईतील मध्य रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात ताला ठोको आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यांनी ठाकुर्ली येथे रस्ता ओव्हर ब्रिज, डोंबिवली रेल्वे स्थानकाजवळ चांगल्या पार्किंग सुविधा आणि कल्याण-डोंबिवली समांतर रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या मागण्या मांडल्या. चव्हाण यांनी ठाकुर्ली प्रकल्पासाठी आमदार निधीतून २ कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिले. मध्य रेल्वे व्यवस्थापनाने उपस्थित केलेल्या चिंतांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.



डोंबिवलीमध्ये नमो नमो दांडिया कार्यक्रमाचे आयोजन करत दररोज ५०,००० नागरिक सहभागी होतात. रविंद्र चव्हाण यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. गुढीपाडवा शोभायात्रेतील त्यांचा सहभाग असतो. चव्हाणांनी नगरसेवक असल्यापासून देशभक्ती, समाज प्रबोधनाचे विषय मांडण्यास सुरुवात केली होती. २०१० साली त्यांनी आदर्श डोंबिवलीकर पुरस्कार देण्यास सुरूवात केली. विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डोंबिवलीकरांना हा पुरस्कार दिला जातो. मतदारसंघात रोझ फेस्टिव्हल, मुलांसाठी किलबिल महोत्सव, कला क्रीडा महोत्सव, डोंबिवली रेल परिषदेचे आयोजन, डोंबिवलीकर संगीत महोत्सव असे उपक्रम त्यांनी राबवले आहेत. चव्हाण यांनी २०१४ साली डोंबिवलीकरांना फ्री वायफाय सुविधा सुरू केली होती.

**मंत्री म्हणून कार्य**

रवींद्र चव्हाण यांनी गरिबांसाठी 'आनंदाचा शिधा' उपक्रम सुरू केला, सणा सुदीच्या दिवसात आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबांना अनुदानित रेशन पुरवले जात असे . कोकण प्रदेशातील मंदिरांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी काम केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री म्हणून काम करणाऱ्या चव्हाण यांनी प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली (पीएमआयएस) सुरू केली, ज्याचे उद्दिष्ट पारदर्शकता सुधारणे आणि प्रकल्प देखरेख सुलभ करणे हे होते. त्यांनी भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी देखील प्रयत्न केले, विशेषतः 'कॅश-फॉर-ट्रान्सफर' पद्धतींना संबोधित करणे आणि कर्मचारी व्यवस्थापनात जबाबदारी मजबूत करणे. कोकणात पर्यटनाला चालना देण्यासाठी १२ रेल्वे स्थानकांसाठी ५६.२५ कोटी बजेटसह सौंदर्यीकरण आणि पायाभूत सुविधा विकास प्रकल्पावर काम केले .

रवींद्र चव्हाण यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून ९२ हजार कोटी रुपयांची विकास कामे केली, ज्यामध्ये महाराष्ट्रातील रस्ते, पूल आणि इमारतींवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी केंद्र सरकारच्या अक्षय ऊर्जा स्त्रोत योजनेअंतर्गत डोंबिवलीतील २६८ गृहनिर्माण संस्थांना मोफत सौर ऊर्जा युनिट्सचे वितरण देखील केले. चव्हाण यांनी १२ वर्षांपासून रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्ग प्रकल्पातील दीर्घकाळ चाललेल्या विलंबांवर लक्ष केंद्रित केले. त्यांच्या नेतृत्वाखाली, जमीन संपादनाचे प्रश्न सोडवण्यात आले आणि जमीन देणाऱ्या कोकणातील रहिवाशांना भरपाई मिळाली. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री असताना, चव्हाण यांनी ७० बेघर कातकरी कुटुंबांचे पुनर्वसन करून घरे बांधण्यासाठी जमीन उपलब्ध करून दिली.

*कार्याची पावती*

पहिला रेल प्रवाशी मित्र पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या जीवनावर ' जे देखे रवी ' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

११ जानेवारी २०२५ रोजी त्यांना भारतीय जनता पार्टी महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले.

देशात नरेंद्र, महाराष्ट्रात देवेंद्र अन पक्षात रवींद्र असे नवे पर्व म्हणून नवीन प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड होत आहे. त्यांच्या भावी कार्यास हार्दिक शुभेच्छा...!

**संकलन**
**भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा संयोजक, भाजपा,**
**सोशल मिडीया सेल, उत्तर नगर जिल्हा**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.